वाचा :- मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३१, ३२अ, ३२ब व ३३ बाबत...
संदर्भ :- मा. अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेली दि.१८/१०/२०११ ची आढावा बैठक.

---

क्र.का.५/मुद्रांक-११/प्र.क्र. ५९ /११/१५०४/११
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक -२१/१०/२०११

## परिपत्रक -

मा. अपर मुख्य सचिव (म. व पू.) यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या मुद्रांक शुल्क वसूलीबाबत दि.१८/१०/२०११ रोजीच्या आढावा बैठकीत मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३१, ३२अ, ३२ब, ३३ व ३३अ मधील शिल्लक प्रकरणाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये असे निदर्शनास आले की, वरील कलमां खालील प्रकरणे सर्व विभागात मोठया प्रमाणावर प्रलंबित असल्याचे दिसून आले आहे.

वरील कलमाखालील सर्व प्रकरणे ही शासन महसूलाशी संबंधित असून, विशेषतः कलम ३१ खालील होणाऱ्या अभिनिर्णय प्रकरणासाठी यापूर्वी या कार्यालयाने दि.२०/१०/२००५ रोजी काढलेल्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदर परिपत्रकान्वये अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, सर्व कागदपत्रांची पूर्तता होत असल्यासच प्रकरण अभिनिर्णयासाठी स्विकारावेत. सदर परिपत्रकातील सर्व सुचनांची अंमलबजावणी ही काटेकोरपणे होईल, याबाबींची दखल संबंधितांनी घ्यावी. यापुढे सर्व कागदपत्रांची पूर्तता होत असल्याचे तपासूनच प्रकरण स्विकारण्याची दक्षता घ्यावी. तसेच शिल्लक असलेल्या सर्व अभिनिर्णय प्रकरणाचा आढावा सर्व संबंधितांनी त्वरीत घ्यावा व ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीची सर्व प्रकरणे तातडीने म्हणजे दि.३१/१२/२०११ पर्यंत निर्गत होतील, याची दक्षता घ्यावी.

त्याचप्रमाणे मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३२अ, ३२ब, ३३ व ३३-अ मधील सद्यस्थितीतील शिल्लक प्रकरणाचा देखील याप्रमाणे आढावा घेवून, तीन महिन्याच्या वरील सर्व प्रकरणाचा निपटारा वर नमूद केल्याप्रमाणे दि.३१/१२/२०११ पर्यंत पूर्ण करावा.

सही/-xxx
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :-

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
२) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
३) सर्व सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी

निर्गमित,

सह नोंदणी महानिरीक्षक व
मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), म.रा. पुणे.